घेवुन भरुन पावलो ते मला कबुल व मान्य ते यात मजरा.
-----------------

एकुण रुपये /-अक्षरी रुपये मात्र

२) वर नमूद केलेल्या किंमतीमध्ये फक्त परिशिष्ठ २ यांत वर्णन केलेली जागा आम्ही तुम्हांस विक्री केलेली आहे. मात्र या किंमतीमध्ये खालील प्रमाणे गोष्टींचा समावेश नाही व त्या रक्कमा तुम्ही आम्हांस ज्या ज्या वेळी मागणी होईल त्या त्या वेळी ताबडतोब देत जाण्याच्या आहेत. विलंब झाल्यास दंड रु.२द.मा.द.शे प्रमाणे द्यावा लागेल.

त्या बाबींचा तपशिल असा की,

अ. वॉटर मीटर कनेन्शनचा खर्च.

ब. सोसायटी/अपार्टमेंट अथवा असोसिएशन रजिस्ट्रेशन याचा खर्च

क. परिशिष्ठ २ यांत वर्णन केलेली जागा स्वतंत्रपणे खरेदी घेण्यासाठी लागणारा स्टॅम्प, लिहीणावळ, नोंदणावळ व /अगर अन्य खर्च यातील हिस्सेराशीने येणारी रक्कम.

ड. तसेच सदर फ्लॅट मिळकतीचे खरेदीखताचे किंमतीवर येणारा व्हॅट, सर्वीस टॅक्स या शिवाय यदाकादाचित सरकारने अतिरिक्त फ्लॅट/दुकान यावरील वगैरे अथवा अमळनेर नगरपरिषद, अमळनेर अन्य कुठल्याही कारणास्तव नवीन काही गोष्टीची मागणी केली तर त्या गोष्टीसाठी येणारा खर्च यातील सामाईक हिस्सा अशी रक्कम तुम्ही आम्हांस अलाहिदा द्यावयाची आहे.

३) इमारतीचे बांधकाम करतांना आणि बांधीव भाग ताब्यांत देतांना जो एफ. एस. आय. बांधकामासाठी शिल्लक असेल अथवा विक्री केलेला नसेल तो सर्व भाग आमचे मालकीचा राहील. तसेच त्या बांधकामाची पाहीजे तशी विल्हेवाट विक्री करणेचा, तसेच शिल्लक असलेला एफ. एस. आय. वापरणेचा आमचा हक्क कायम आहे व त्यासाठी जे बांधकाम करणे आम्हांस सोयीचे वाटेल ते बांधकाम आम्ही जागेचे ठिकाणी, मिळकतीची ठिकाणी करु.

४) बांधीव फ्लॅट तुमच्या ताब्यात दिल्या नंतर तुम्ही त्या जागेचा उपयोग सुज्ञ मानसाप्रमाणे करावा व त्याबद्दल तुम्ही असे कबुल करित आहात की, :-

१) जागा उत्तम स्थिती मध्ये तुम्ही तुमच्या पदर खर्चाने ठेवावयाची आहे. तसेच जागेमध्ये तुम्ही कोणत्याही प्रकारे बदल परस्पर करावयाचे नाहीत की, ज्यायोगे नगरपालीके कडुन आमचे विरुध्द काही कार्यवाही केली जाईल.

२) सदर जागेमध्ये कोणत्याही प्रकारे स्फोटक वस्तु तुम्ही साठवु नये , अथवा ज्या गोष्ट स्थानिक स्वराज्य संस्थेने रहिवासी इमारतीत अथवा त्यामधील मिळकतीत साठवु नये अशा प्रकारे जाहिर केले असेल त्या ही वस्तु अथवा त्याचे खोके ठेऊन जागेचे अथवा इमारतीचे नुक सान करावयाचे नाही. अशा रितीने जागेचा वापर केल्याने कोणत्याही जागेचे अथवा इमारतीचे नुकसान झाल्यास नुकसान भरुन देण्याची जबाबदारी तुमच्यावर राहिल.

३) जागेमध्ये जागेचा भिंती, छत, जमिन वैगरेची सर्व व्यवस्था उत्तम रितीने व वेळोवेळी दुरुस्ती करुन ठेवण्याची जबाबदारी तुमची असून आम्ही ज्याप्रकारे बांधीव जागा तुमचे ताब्यांत देवू त्याच रितीने